## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/०७/२०१९
## दि.१०/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ६३७/१९,भादविक ३९४,४२७,३४ |
| **फिर्यादी** | दिव्येश ठक्कर,वय-३३ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपी** | दोन मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम २० ते ३० वयोगटातील (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०७/२०१९ रोजी पहाटे ०१/२५ वा. पॅनकार्ड क्लब रोड,मुरकुटे गार्डन जवळ,बाणेर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे ऑफीस मधुन सुटुन पायी हॉटेलवर मुक्कामासाठी जात असताना, यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून फिर्यादी यांचे जवळ येवुन, त्यांचे समोर गाडी आडवी लावुन,त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता,फिर्यादी हे घाबरून पळत असताना, सदर इसमांनी त्यांना पकडुन त्यांच्याकडे पैशाची मागणी करून,त्यांचेवर कोयत्याने फिर्यादीचे डाव्या हाताचे करंगळीस गंभीर दुखापत करून,त्यांचेजवळील रोख ६० रूपये असलेले पाकीट व मोबाईल असा एकुण ५११०/-रू किचा ऐवज जबरदस्तीने काढुन घेवुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बालाजी मगर ९९२१४८०३६३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २४४/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | दिपक वाधवानी,वय-५६,रा.साधुवासवानी चौक,कॅम्प,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०७/२०१९ रोजी २०/३० ते दि.०८/०७/२०१९ रोजी ०३/३० वा. चे दरम्यान ५३१, बुधवार पेठ,पुणे येथील गोडवुन मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे गोडावुन कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे गोडावुनचे भितींची लाकडी जाळी कशाचे तरी सहाय्याने तोडुन,त्यावाटे आत प्रवेश करुन गोडावुन मधील (लिग्रँड कंपनीचे एमसीबी बॉक्स,डिस्ट्रयुब्युशन बॉक्स) २४,६०,०००/- रु किंचा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.डी.मगर ९९२१४८०३६३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४०५/१९,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | गौरव कदम,वय-२३ वर्षे,रा.पाटीलनगर,बालाजीनगर,धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०७/२०१९ रोजी सकाळी ०८/३० वा.ते १६/१५ वा. चे दरम्यान स.नं.२०/१,हेरंब हौसिंग सोसायटी,चौथा मजला,फ्लॅट नं.४१३,काशीनाथ पाटीलनगर,बालाजीनगर,धनकवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण २,०८,०००/-रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.एच.खामगळ ९८८१३३५५५६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २७३/१९,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | आर.व्ही.शेवते, सहा.पो.निरीक्षक, वारजे पो.स्टे पुणे शहर |

**आरोपी** १.बांधकाम प्रकल्पाचे व्यावसाईक भागीदार २.विकसक ठेकेदार (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०७/२०१९ रोजी ०८/४५ वा.सिटी सर्वे नं.११/१,वारजे-माळवाडी,पुणे या ठिकाणी कॅव्हन साईट या नियोजित बारा मजलीचे इमारती समोर वारजे,पुणे येथे

**तपशिल** वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद अनुक्रमे १.बांधकाम प्रकल्पाचे व्यावसाईक भागीदार २.विकसक ठेकेदार यांनी त्यांचे कॅव्हन साईट,पुणे येथील नियोजित बारा मजलीचे इमारतीचे बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार दिलीप कुमार रज्जु यादव,वय-२५ वर्षे,रा.सदर हा बिल्डिंगचे प्लॅस्टरचे काम करीत असताना,तो वरुन खाली जमिनीवर पडल्याने गंभीररित्या जखमी होवुन मयत झाला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एन.एस.गंधारे ८८८८३३९३३९

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे ४८१/१९,भादविक ४२०,३४

**फिर्यादी** एक पुरूष,वय-३३,रा.कात्रज,पुणे

**आरोपी** मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१०/०७/२०१९ रोजी १०/३० वा. फिर्यादीचे राहते घरी

**तपशिल** फिर्यादी यांची आई त्यांचे राहते घरी एकटया असताना, यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे घरी येवुन,फिर्यादी यांचे आईचा विश्वास संपादन करून,त्यांना गाईचा चिक देण्याचे बहाण्याने तसेच त्यांचे गळयातील सोन्याचे दागिन्यांची डिझाईन पाहण्याचे बहाण्याने सोन्याचे दागिने १,२५,४१९/- रू किंचे गळयातुन काढुन देण्यास भाग पाडुन,त्यांची आई बाहेर उभी आहे असे फिर्यादी यांचे आईस सांगुन,बंगल्याचे बाहेर असलेल्या मोटार सायकलवरून सदरचे दागिने घेवन पळुन गेले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ४९७/१९,भादविक ४२०,४०६

**फिर्यादी** एक महिला,वय-२९ वर्षे,रा.थिटे नगर,खराडी,पुणे

**आरोपी** व्हॅकेन्टा इंन्फ्रा सर्व्हिस प्राय.लिमी. कंपनी,४-डी,दुसरा मजला,बी-३,बिल्डींग सेरेब्रेम,आय.टी. पार्क,कल्याणीनगर,पुणेचे संचालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०३/२०१९ रोजीपासुन ते आजपावेतो व्हॅकेन्टा इंन्फ्रा सर्व्हिस प्राय.लिमी.कंपनी,४-डी,दुसरा मजला,बी-३,बिल्डींग सेरेब्रेम,आय.टी.पार्क,कल्याणीनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील व्हॅकेन्टा इंन्फ्रा सर्व्हिस प्राय.लिमी.कंपनी,४-डी,दुसरा मजला,बी-३,बिल्डींग सेरेब्रेम, आय.टी.पार्क,कल्याणीनगर,पुणेचे संचालक याने फिर्यादी व इतर साक्षीदार यांचेकडून एकुण २,३६,०००/- रूपये घेवुन,त्यांना हॉलीडे पॅकेज मेंबरशिप व जीम मेंबरशिप देतो असे अश्वासन देवुन,त्यांचेकडुन नमुद रक्कम घेवुन,त्यांना अदयापर्यंत कोणतेही हॉलिडे पॅकेज अथवा जिम मेंबरशिप न देता फिर्यादी व इतर साक्षीदार यांनी दिलेल्या पैश्याचा अपहार करून,त्यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. बलभीम ननवरे ८२०८०८९४४७

## <u>दि.११/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** समर्थ पो स्टे २०८/१९,भादविक ३९४,३२४,५०४,३४

**फिर्यादी** सचिन भालेराव,वय-३९,रा.न्यु नाना पेठ,पुणे

**आरोपी** फिरोज मकबुल खान उर्फ बबाली,वय-४०,रा.भवानी पेठ,पुणे (अटक) व इतर एक

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०७/२०१९ रोजी १९/३० वा. पद्मजी चौका जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वडील यांचेसह त्यांचे राहते घरी येत असताना,नमुद इसमांनी त्यांचे जवळ अचानकपणे येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन पकडुन जबरदस्तीने ओढण्याचा प्रयत्न करीत असताना,फिर्यादी हे प्रतिकार करीत असताना,सदर इसमांनी फिर्यादी व त्यांचे वडीलांचे डोक्यात लाकडी बांबुने मारून,त्यांना दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.जी.पालांडे ९४२३००२११८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**